प्रकल्प अंमलबजावणी समितीने दि.२४/०७/२०२६ रोजीच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार प्रकल्पांना व त्यावरील खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : PIC-२०२६/प्र.क्र.८२/Tech-१ (E-1731561)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १२ ऑगस्ट, २०२६

**संदर्भ :**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती-०५/४३६/३९, दि. १० फेब्रुवारी, २००५.

२. सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन निर्णय क्र. HPC-२०२६/C.R.२७/IT, दि. २७/०२/२०२६.

३. दि. २४ जुलै, २०२६ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :**

राज्याचे प्रशासन अधिक गतिमान तसेच लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी प्रशासकीय कामकाजाचे संगणकीकरण करून त्याच्या अंमलबजावणीसाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे दि. २३ सप्टेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये "ई प्रशासन धोरण" तयार करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये घालून दिलेल्या मर्यादेनुसार माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांना आणि बाबींना रुपये दहा लाख ते रुपये पाच कोटी पर्यंत येणाऱ्या खर्चास प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांसाठी येणाऱ्या बाबींवरील खर्च मंजूर अर्थसंकल्पीय निधीतून तसेच शासनाकडून ई-गव्हर्नन्स प्रकल्पाकरिता राज्य सेतू सोसायटीला प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात येतो. प्रकल्प अंमलबजावणी समितीने दि. २४ जुलै, २०२६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांसंबंधी प्रशासकीय आदेश निर्गमित करणे आवश्यक होते.

**शासन निर्णय :**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयानुसार गठीत केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक दि. २४ जुलै, २०२६ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार खालील बाबी/प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अजेंडा क्र. | समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय | प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत घेतलेला निर्णय | समितीने घेतलेला निर्णय / निर्णयानुसार खर्चास मान्यता |
|---|---|---|---|---|
| १ | १ | मा. मुख्य सचिव कार्यालयात शासन निर्णय, दि.०५.१०.२०२३ मधील तरतूदीनुसार मे. प्रायमस पार्टनर्स प्राईव्हेट लिमिटेड या संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या एका (१) वरिष्ठ सल्लागाराच्या सेवांना माहे जुलै, २०२६ ते जून, २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्याबाबत व प्रयोजनाकरिता येणारा खर्च रु.४२,३५,०००/- (कर वगळून) यास मान्यता देण्याबाबत | प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तत्कालीन माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक २८.०१.२०२६ रोजीच्या कार्यादेशानुसार मुख्य सचिव कार्यालयात एका (१) वरीष्ठ सल्लागार या मनुष्यबळाच्या सेवा दि.०१.१०.२०२५ ते दि.३०.०६.२०२६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत सदर सेवांचा कालावधी संपुष्टात आला असल्याने सदर मनुष्यबळाच्या सेवांना (१ प्रधान सल्लागार) दि.०१.०४.२०२६ ते दि.३१.०३.२०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सदर प्रयोजनाकरीता येणाऱ्या रु.४२,३५,०००/- (कर वगळून) इतका खर्च आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. | समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबीसाठी येणारा खर्च रु.४२,३५,०००/- (कर वगळून) मागणी क्र. A०४, मुख्य लेखाशीर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशीर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा. |
| २ | २ | मुख्यमंत्री सचिवालयाकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (मातं), दिनांक १३.०३.२०२६ मधील तरतुदीनुसार मे. किर्तने आणि पंडीत चार्टर्ड अकाउंट्टस यांच्यामार्फत “सल्लागार” या अतांत्रिक मनुष्यबळांच्या सेवा दि.०१ जून, २०२६ पासून ११ महिन्याच्या | प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार मुख्यमंत्री सचिवालयाकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (मातं), दिनांक १३.०३.२०२६ मधील तरतुदीनुसार मे. किर्तने आणि पंडीत चार्टर्ड अकाउंट्टस यांच्यामार्फत “सल्लागार” या मनुष्यबळाच्या सेवा दि.०१ जून, २०२६ पासून ११ महिन्यांच्या | समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबीसाठी येणारा खर्च रु.२२,००,०००/- (कर वगळून) मागणी क्र. A०४, मुख्य लेखाशीर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००)(११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशीर्षा |

| अ.क्र. | अजेंडा क्र. | समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय | प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत घेतलेला निर्णय | समितीने घेतलेला निर्णय / निर्णयानुसार खर्चास मान्यता |
|---|---|---|---|---|
| | | कालावधीकरीता घेण्यास मान्यता व त्याकरीता येणाऱ्या खर्च रु.२२,००,०००/- (कर वगळून) मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव. | कालावधीकरीता घेण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रयोजनाकरीता येणाऱ्या खर्च रु.२२,००,०००/- (कर वगळून) आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. | अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा. |
| ३ | ३ | Proposal for approval to the Cyber Security Audit of 10 Key Government of Maharashtra Digital Portals by Maharashtra Cyber Crime Security Corporation at estimated cost Rs.51,00,000/- (Excluding tax) and quarterly maintenance cost of Rs.2,50,000/- (Excluding tax) for a period of 3 years. The Total Cost for the same is Rs.81,00,000/- (Excluding GST) | The Project Implementation Committee has approved the proposal to conduct a Cyber Security Audit of 10 key Government of Maharashtra digital portals by the Maharashtra Cyber Crime Security Corporation. The initial audit is approved at an estimated cost of Rs.51,00,000/- (excluding tax) supplemented by a quarterly maintenance fee of Rs.2,50,000/- (excluding tax) for a duration of three years, resulting in a total project cost of Rs.81,00,000/- (excluding tax).<br>Furthermore, the Committee decided that the expenditure will be drawn from the 2026–27 financial year budget under the Commissionerate’s budgetary head 2052 0482. | समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबीसाठी येणारा खर्च रु.८१,००,०००/- (कर वगळून) मागणी क्र. A०४, मुख्य लेखाशीर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००)(११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशीर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा. |
| ४ | ४ | ई-ऑफिस प्रणालीचे कामकाज सुरळीतपणे कार्यरत ठेवण्यासाठी राष्ट्रीय माहीतीशास्त्र केंद्र | प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. ई-ऑफिस प्रणालीचे | समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबीसाठी येणारा खर्च |

| अ.क्र. | अजेंडा क्र. | समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय | प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत घेतलेला निर्णय | समितीने घेतलेला निर्णय / निर्णयानुसार खर्चास मान्यता |
|---|---|---|---|---|
| | | (NIC) यांना राज्य सेतू सोसायटीमधून अदा करण्यात आलेल्या रु.३,१६,३०,७४५/- (करासहित) इतक्या खर्चाच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देणे व सदर रक्कम राज्य सेतू सोसायटीला प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देण्याबाबत.. | कामकाज सुरळीतपणे कार्यरत ठेवण्यासाठी राष्ट्रीय माहीतीशास्त्र केंद्र (NIC) यांना राज्य सेतू सोसायटीमधून अदा करण्यात आलेल्या रु.३,१६,३०,७४५/- (करासहित) इतक्या रकमेच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रयोजनाकरीता झालेल्या खर्चाची रु.३,१६,३०,७४५/- (करासहित) रक्कम आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून राज्य सेतू सोसायटीला प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. | रु.३,१६,३०,७४५/- (करासहित) मागणी क्र. A०४, मुख्य लेखाशीर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००)(११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशीर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा. |
| ५ | ५ | महाराष्ट्र राज्य DR SDC च्या कामकाजाकरीता तत्कालीन माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.०६.०६.२०२५ रोजीच्या कार्यादेशान्वये M/s Deloitte या संस्थेमार्फत दि.०६ जून, २०२५ ते दि.०५ ऑगस्ट, २०२५ या कालावधीसाठी घेण्यात आलेल्या एकुण ०२ सल्लागारांच्या (१ Principal Consultant आणि १ Senior Consultant) घेण्यात आलेल्या सेवेस कार्योत्तर मान्यता देण्याबाबत व त्याअनुषंगीक येणारा खर्च रु.१६,७८,०००/- मंजूरी प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव. | महाराष्ट्र राज्य DR SDC च्या कामकाजाकरीता तत्कालीन माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.०६.०६.२०२५ रोजीच्या कार्यादेशान्वये M/s Deloitte या संस्थेमार्फत दि.०६ जून, २०२५ ते दि.०५ ऑगस्ट, २०२५ या कालावधीसाठी घेण्यात आलेल्या एकुण ०२ सल्लागारांच्या (१ Principal Consultant आणि १ Senior Consultant) सेवेस, सदर मनुष्यबळाने केलेल्या कामकाजाची आयुक्तालयाच्या स्तरावर खातरजमा करण्याच्या अधीन राहून, कार्योत्तर मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, सदर प्रयोजनाकरीता येणाऱ्या खर्च रु.१६,७८,०००/- (कर वगळून) आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध | समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबीसाठी येणारा खर्च रु.१६,७८,०००/- (कर वगळून)मागणी क्र. A०४, मुख्य लेखाशीर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००)(११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशीर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा. |

| अ.क्र. | अजेंडा क्र. | समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय | प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत घेतलेला निर्णय | समितीने घेतलेला निर्णय / निर्णयानुसार खर्चास मान्यता |
|---|---|---|---|---|
| | | | असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. | |
| ६ | ६ | The Proposal from MahaIT for the Cyber Security Audit of the MahaSarathi Portal (MHUCDH) of Rs.54,07,500/- exclusive of applicable taxes is placed before PIC for approval. | The Project Implementation Committee has decided to grant post facto approval to the proposal from MahaIT to conduct a Cyber Security Audit of the MahaSarathi Portal (MHUCDH) of Rs.54,07,500/- (excluding tax) by the Maharashtra Cyber Crime Security Corporation. Furthermore, the Committee decided that the expenditure will be drawn from the 2026–27 financial year budget under the Commissionerate’s budgetary head 2052 0482. | समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबीसाठी येणारा खर्च रु.५४,०७,५००/- (कर वगळून) मागणी क्र. A०४, मुख्य लेखाशीर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००)(११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशीर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा. |
| ७ | ९ | राज्यामध्ये स्वतंत्र Science and Technology Department स्थापन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असणारा कृती आराखडा तयार करण्याच्या साठी सर्वकष अहवाल तयार करण्यास्तव सामान्य प्रशासन विभाग (मातं) शासन निर्णय दि.१३.०३.२०२६ अन्वये सूचीबध्द श्रेणी-C (Academic Institutes) मधील संस्थेमधून एका संस्थेची निवड करणे व त्यानुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याबाबत. | प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार राज्यामध्ये स्वतंत्र Science and Technology Department स्थापन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असणारा कृती आराखडा तयार करण्यासाठी सर्वकष अहवाल तयार करण्यास्तव शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (मातं), दि.१३.०३.२०२६ अन्वये सूचीबध्द श्रेणी-C (Academic Institutes) मधील संस्थेमधून Indian Institute of Technology Bombay (IIT Bombay) आणि Indian Institute of Management Nagpur (IIM Nagpur) या दोन संस्थाकडून | समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबीसाठी येणारा खर्च रु.१४,५२,६३५/- (कर वगळून) मागणी क्र. A०४, मुख्य लेखाशीर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००)(११) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२), "१७-संगणक खर्च" या लेखाशीर्षा अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा. |

| अ.क्र. | अजेंडा क्र. | समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला विषय | प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत घेतलेला निर्णय | समितीने घेतलेला निर्णय / निर्णयानुसार खर्चास मान्यता |
|---|---|---|---|---|
| | | | प्राप्त झालेल्या तांत्रिक व वित्तीय प्रस्तावांचे मुल्यांकन करुन त्यामधून Indian Institute of Technology Bombay (IIT Bombay) या संस्थेची निवड करण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रयोजनाकरीता येणाऱ्या खर्च रु.१४,५२,६३५/- (कर वगळून) आयुक्तालयाच्या २०५२ ०४८२ या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. | |

२. सदर शासन निर्णयान्वये आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई यांना प्रचलित नियमानुसार आवश्यक अटी व शर्तींचे पालन करून उपरोक्त प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त खर्चाकरिता कक्ष अधिकारी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी व उपसचिव, माहिती तंत्रज्ञान हे नियंत्रक अधिकारी असतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०८१२११४५०८२५११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.08.12 11:46:24 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०. शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
११. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय
१२. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१३. महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१४. महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१७. आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित
१९. निवडनस्ती